खास पुतळ्याचा विलक्षण प्रवास

लेखक: **ऍलिस रॉस व केंट रॉस**

चित्रे व सजावट: **लेस्ली बोमन**

अनुवाद: **सुजाता गोडबोले**



खास पुतळ्याचा विलक्षण प्रवास





लेखकाचे टिप्पण

न्यूयॉर्क बंदरात एका स्वतंत्र बेटावर स्वातंत्र्य देवतेचा पुतळा उभा आहे. १८८४ साली फ्रान्सच्या रहिवाशांनी १५१ फूट उंचीचा हा तांब्याचा पुतळा अमेरिकेतील लोकांना भेट दिला. जगभरात हा पुतळा अमेरिकेचे आणि स्वातंत्र्याचे प्रतीक म्हणून प्रसिद्ध आहे.

१८६५ साली एका मेजवानीत या पुतळ्याची कल्पना जन्माला आली. लोकांना त्यावेळी अमेरिकेचे कौतुक होते. या दोन्ही देशांत स्वातंत्र्याचे जे प्रेम होते ते साकारण्यासाठी त्यांना काहीतरी प्रतीक हवे होते.

या मेजवानीत फ्रेडरिक बार्थोल्दी नावाचे एक शिल्पकार उपस्थित होते. ही कल्पना त्यांना फार आवडली. त्यांनी लगोलग हातात मशाल घेतलेल्या स्त्रीच्या भव्य पुतळ्याची रेखाटने करण्यास प्रारंभ केला. पुढील दहा वर्षात त्यांनी ही योजना तयार केली आणि त्यासाठी निधीही उभारला. या पुतळ्याच्या निर्मितीच्या कामावर त्यांनी बारीक लक्ष ठेवले.

हा चकाकणारा तांब्याचा पुतळा तयार झाल्यावर त्याचे भाग सुटे करण्यात आले आणि अटलांटिक महासागर ओलांडून न्यूयॉर्कला पाठवण्यासाठी एका जहाजावर चढवण्यात आले. दोन आठवड्यांचा प्रवास झाला असताना वाटेत एक मोठे वादळ झाले आणि त्यामुळे जहाजाला आणि पुतळ्यालाही मोठाच धोका निर्माण झाला. 'खास पुतळ्याचा विलक्षण प्रवास' ('द कॉपर लेडी') ही वादळात काय होऊ शकले असते याची एक काल्पनिक कथा आहे. स्वातंत्र्य मिळवण्याच्या प्रयत्नात असलेल्या पॅरिसमधील एका लहान मुलाची देखील ही गोष्ट आहे.





पॅरिस, फ्रान्स
१८८३ चा अखेरचा काळ

"ए पोरा!" लुई माले ओरडले.

"तू परत तो पुतळा पहायला गेला होतास ना?"

आंद्रेने उत्तर देण्याचा प्रयत्न केला,

"हो, पण मी काम संपवलं आहे..."

मालेनी आंद्रेचा दंड पकडला

आणि ओरडले,

"परत जर मी तुला पुतळ्याकडे जाताना पाहिलं

तर तुला जेवण मिळणार नाही!

जा, आता गाढव आण

आणि गाडीत सामान भरून घे!"

आंद्रेने कोळसा गाडीत भरायला सुरुवात केली.

ते करताना देखील तो

तांब्याच्या सुंदर पुतळ्याचाच विचार करत होता.

तिचे सुंदर डोळे आणि तिच्या हातातली मशाल

त्याच्या डोळ्यासमोरुन हलत नव्हती.

आंद्रेचे आई-वडील

दोन वर्षांपूर्वी, तो ९ वर्षांचा असताना

मरण पावले होते.

तो आता लुई माले

या त्यांच्या शेजाऱ्यांकडे राहत होता.



त्या बदल्यात माले यांना

कोळसा पोचवण्याच्या कामात

आंद्रे मदत करत असे.

थोड्याच दिवसात,

आंद्रे एकटाच सर्व काम पाहू लागला.

माले त्याला थोडेसे शिळेपाके अन्न

आणि तबेल्यात झोपायला देत असत.

पण त्याला कामाचे पैसे किंवा मोकळा वेळ मिळत नसे.

परंतु, तरीही आंद्रे मात्र पुतळ्याकडे परत परत जात असे.



दुसऱ्या दिवशी कामाला जाण्यापूर्वी

आंद्रेने एक सफरचंद घेतले.

जोसेफिन या गाढवाने लवकर पाय उचलावेत

म्हणून त्याने ते आपल्या खिशात ठेवले.

अखेर त्याचे कोळसा पोचवण्याचे

सर्व काम पार पडले.

मग कामगार पुतळा बनवण्याचे काम करत होते
तिथे तो घाईघाईने गेला.
फ्रेंच लोक हा पुतळा अमेरिकेतील लोकांना
भेट म्हणून देणार होते.
काही लोक तिला
‘जगाला प्रकाश देणारे स्वातंत्र्य’
किंवा थोडक्यात ‘स्वातंत्र्य देवतेचा पुतळा’
असे म्हणत असत.
आंद्रे साठी मात्र ती ‘एक देवता’ होती.



आंद्रे दाराशीच थबकला.

लाकडाचा चुरा आणि वाफ,

लाकूड आणि चुना,

भट्टीतील आग आणि लोखंड

या सगळ्याचा वास त्याला फार आवडत असे.





कधीकधी तो कामगारांना त्यांच्या कामात मदत करत असे.

आज त्याने लोहारकाम करणाऱ्या

कामगारांसाठी भट्टीला वारा देण्याचे काम केले.

पुतळ्याचा सांगाडा बनवण्यासाठी आता

लोखंडाला आकार देण्याचे काम चालू होते.

त्याने सुतारांना खिळे नेऊन देण्याचे

कामही केले.

तांब्याच्या पत्र्यांना आकार देण्यासाठी

लाकडी सांगाडा आणि साचे बनवण्याचे काम सुरु होते.




तांबटांचे काम पाहण्यात

आंद्रे अगदी रंगून जात असे.

तांब्याच्या पत्र्यावर हातोडा मारला की

‘घण! घण!’ असा आवाज येत असे.



कोणीतरी आंद्रेच्या खांद्यावर हात ठेवला.

ते होते फ्रेडरिक ऑग्युस्त बार्थोल्दी.

पुतळ्याची जबाबदारी त्यांच्यावर होती.

“तू परत आलेला दिसतोस!’ ते म्हणाले.

“होय, साहेब!” आंद्रेने उत्तर दिले.

“आज मी हातोडी घेऊन काम करू का?”

“पण आणखी एका तांबटाला देण्यासाठी माझ्याकडे

पैसे नाहीत,” बार्थोल्दी म्हणाले.

“मला पैसे नाही दिलेत तरी चालेल,”

संधी मिळण्याच्या आशेने आंद्रे म्हणाला.

“ठीक आहे. प्रयत्न करून पहा,”

बार्थोल्दीनी परवानगी दिली.

तांब्याच्या पत्र्यातून पुतळ्याच्या

कपड्याच्या चुण्या आणि

तांबूस रंगाची त्वचा तयार झाली.

तांबटांनी जणू तिला जिवंत केले!





आंद्रेने एक लाकडी साचा,

एक हातोडी आणि तांब्याचा पत्रा घेतला.

इतर तांबटांचे काम पाहून

त्याने तांब्याचा तो पातळ पत्रा त्या साच्यात

काळजीपूर्वक बसवायला सुरुवात केली.

“आंद्रे, तुझ्या हातात चांगले कसब आहे,”

काही दिवसांनी बार्थोल्दी म्हणाले.

“उद्या तू पुतळ्यावर काम कर.”

दुसऱ्या दिवशी

आंद्रेने दोन सफरचंदे घेतली!

जोसेफिन आता चांगली वेगाने धावू लागली.

लवकरच आंद्रे तांब्यावर घण मारण्याचे

काम करू लागला.

“आता हा पुतळा अमेरिकेला जाण्यासाठी

जवळ जवळ तयार झाला आहे, नाही का?”

आंद्रेने बार्थोल्दीना विचारले.

“हो. पण तिला उभे करण्यासाठी चौथरा बांधायला

अमेरिकेतील लोकांना निधीची गरज आहे,” ते म्हणाले.

“तुला या देवतेच्या डोक्यावरील मुकुटापर्यंत

जायचे आहे का?”

बार्थोल्दीनी कारखान्याच्या मागच्या बाजूचे

एक दार उघडले.

आंद्रे आणि बार्थोल्दी पायऱ्या चढून

डोक्यापर्यंत पोचले.





आंद्रे मुकुटाच्या काठापर्यंत वर चढला.

खाली काम करणारे कामगार

खेळातल्या सैनिकांसारखे दिसत होते.

“बार्थोल्दी साहेब, आपण हा पुतळा

अमेरिकेला का पाठवतो आहोत?

आपण तो इथेच का नाही ठेवत?”

आंद्रेने विचारले.



ते दोघे खाली उतरले

तेव्हा सूर्य मावळतीच्या जवळ आला होता.

लवकरच अंधार पडणार होता.

जोसेफिनला घेऊन

आंद्रे घाईघाईने रस्त्यातून निघाला.

माले त्यांची वाटच पाहत होते.

“तू परत उशिरा आला आहेस,” ते खेकसले.

आज तुला जेवायला

पाव आणि चीज पण मिळणार नाही!”

“फ्रान्स आणि अमेरिका

यांच्यातील मैत्रीचे हा पुतळा

म्हणजे एक प्रतीक आहे,” बार्थोल्दीनी उत्तर दिले.

“दोन्ही देशांनी लोकांना हवे तसे

जगण्याचे आणि काम करण्याचे

स्वातंत्र्य मिळवण्यासाठी लढा दिला आहे.

स्वातंत्र्य देवतेचा हा पुतळा आपल्याला

ते स्वातंत्र्य जपण्याची प्रेरणा देईल.”





थंडी जसजशी वाढू लागली,

तसे आंद्रेचे कामही वाढले.

बऱ्याच वेळा ते अंधार पडेपर्यंत चाले.

कधी त्याला भूक लागायची,

त्याचा फाटका कोट

थंडीसाठी पुरेसा नव्हता.

घरी वेळेवर येण्याची तो काळजी घेत असे,

पण बऱ्याच वेळा तो पुतळा पहायला जात असे.

पुतळ्याच्या करंगळी साठी तांब्याचा पत्रा

ठोकण्यासाठी त्याने मदत केली होती.

देवतेच्या करंगळीची लांबी होती

सात फूट!

पुढल्या वर्षीच्या वसंत ऋतूत

एक दिवस आंद्रे बार्थोल्दीच्या

शेजारी उभा होता.

ते दोघे पुतळ्याकडे पाहत होते.

पुतळा आता पूर्ण झाला होता.

हातातील मशालीपासून

ते पायाच्या अंगठ्यापर्यंत

पुतळा सूर्यप्रकाशात चमकत होता.

आंद्रे म्हणाला, “देवते,

तू किती सुंदर आहेस!”







अखेर पुतळा अमेरिकेत पाठवण्याची

वेळ येईपर्यंत आणखी एक वर्ष उलटले.

एक दिवस सकाळी

आंद्रेने जोसेफिनला बाजारासमोर थांबवले.

वर्तमानपत्रे विकणारा एक मुलगा

ओरडत होता,



"'स्वातंत्र्य देवतेच्या पुतळ्याची गोष्ट वाचा!"

"पुतळ्याचे काय?" आंद्रेने विचारले.

"अमेरिकेला पाठवण्यासाठी

आता तो पुतळा उतरवला जात आहे.

तीच तर गोष्ट आहे," मुलाने सांगितले.

त्या रात्री आपल्या फाटक्या चटईवर

पडला असताना

आंद्रे पुतळ्याचाच विचार करत होता.

आता तो त्याला परत कधीच दिसणार नाही.

अमेरिका कशी असेल

याची तो कल्पना करू लागला.



२० मे १८८५
रुऑ, फ्रान्स

आंद्रे खोक्यांच्या एका रांगेमागे दडून बसला.

खलाशांनी त्याला पहिले असेल का?

तिकडे पॅरिसमध्ये

कामगारांनी पुतळ्याचे भाग वेगळे करून

दोनशेपेक्षा अधिक लाकडी खोक्यांमध्ये

व्यवस्थित भरले होते.

एखादा तरुण तिथे चांगली मजुरी मिळवून

नव्याने आयुष्य सुरु करू शकतो,

अशा गोष्टी त्याने ऐकल्या होत्या.

मला जर पुतळ्याबरोबर तिथे

जाता आले तर...

अचानक तो उठून बसला.

त्याला एक कल्पना सुचली होती.

कदाचित ती प्रत्यक्षात येईल देखील!



त्या खोक्यांबरोबर आंद्रेने

आगगाडीतून या मोठ्या बंदरापर्यंत

प्रवास केला होता.


आता ‘इझेर’ नावाच्या युद्‌धनौकेवर

शेवटचे खोके चढवण्यात आले होते.

तो जर चटकन बोटीवर चढला नाही,

तर पुतळा अमेरिकेला निघून जाईल.





आंद्रेने एक मोठा श्वास घेतला.

मग तो बोटीत चढण्याच्या फळीवरून

जोरात पळत सुटला.

दोरखंडाच्या एका मोठ्या वेटोळ्यामागे लपून

सर्व आवाजांचा कानोसा घेत तो वाट पाहू लागला.

त्याची छाती जोरजोरात धडधडत होती.

मागच्या बाजूने

त्याला काही आवाज ऐकू आले.

दोन माणसे त्याच्याजवळून चालत निघाली होती.

आंद्रेने श्वास रोखून धरला

आणि अंधाऱ्या भागात लपून बसला.

ती माणसे निघून गेली, आंद्रे त्यांना दिसला नव्हता.

आता त्याला लपण्यासाठी

एक चांगली जागा शोधायची होती.

आजूबाजूला पाहिल्यावर आंद्रेला डेकच्या खालच्या भागाकडे

जाणारी एक शिडी दिसली.

तिथपर्यंत रांगत जाऊन तो खाली उतरला.



आता तो बोटीच्या सामान भरलेल्या

खालच्या भागात होता.

तिथल्या अंधुक प्रकाशात

खोकी त्याला जेमतेमच दिसत होती.

खोकी दोरखंडाने बोटीला

बांधून ठेवलेली होती.

हळूच तो दोन खोक्यांच्या

मधल्या जागेत जाऊन बसला.

बोटीचा प्रवास सुरु झाल्यावर,

तो हळूच म्हणाला,

“आता आपण अमेरिकेला निघालो आहोत!”





सामानाच्या जागेत बसून आंद्रेचा प्रवास

दोन आठवडे शांतपणे हेलकावे खात चालू होता.

रात्रीच्या वेळी तो डेकच्या वरच्या भागातील

स्वयंपाकघरापर्यंत लपत-छपत येऊन

पाणी आणि थोडेसे खाणे घेऊन जात असे.

एका रात्री तो आपल्या लपण्याच्या जागी

परत येत असताना

आंद्रेला त्याच्या पाठीमागे

फळ्यांच्या कुरकुरण्याचा आवाज येऊ लागला.

कोणीतरी त्याच्यामागे येत असणार!

खलाशांची कुजबुज त्याला ऐकू आली.

त्यांच्यापैकी एकजण म्हणाला,

“इथे एखादा चोर लपलेला असणार.”







अचानक सामानाच्या जागेचे दार

मोठा आवाज करत मोडून पडले.

बोटीचे हेलकावे चालूच होते.

वाऱ्याचाही मोठा आवाज येत होता.

घाईघाईने शिडीवरून वर जाताना

खलाशी ओरडले,

“डेकवर चला! मोठे वादळ येत आहे.”

आंद्रेने हळूच निश्वास सोडला!

पण आता जहाजाचे हेलकावे

वाढले होते

आणि दरवेळी ते अधिक जोराचे होते.

दोरखंडाने बांधलेली खोकी विचित्र आवाज करत

एकमेकांना धक्के देऊ लागली होती.

आंद्रेच्या मानेवर

समुद्राचे गार पाणी ओघळू लागले होते.

अचानक, जहाजाची

एखाद्या उधळलेल्या घोड्याप्रमाणे हालचाल झाली.

आंद्रे जहाजाच्या दुसऱ्या टोकापर्यंत गडगडत गेला.





मोठ्या प्रयत्नाने तो उठून उभा राहिला.

“कडाड कट!”

एक दोरखंड तुटायला आला होता.

जहाजाने आणखी एक उसळी घेतली,

तर ते खोके

इतर खोक्यांवर आपटणार होते.

मग पुतळ्याची मोडतोड होणार!

आंद्रेने तो दोरखंड पकडला

आणि परत बांधण्याचा प्रयत्न करू लागला.

पण ते फारच कठीण होते.

तो शिडीवरून जाऊ लागला

पण वाटेतच थबकला.

जहाजात लपून छपून जाणारे प्रवासी

जर सापडले, तर त्यांची परिस्थिती

फारच वाईट होते, हे त्याला माहित होते.

त्याला कदाचित तुरुंगात पाठवतील.

किंवा त्याहूनही वाईट, म्हणजे मालेकडे परत पाठवतील.

जहाजाचे हेलकावे

वाढतच होते.

सुटे झालेले खोके घरंगळले

आणि जवळच्या दोन खोक्यांवर आदळले.

त्याच्या एका बाजूला चीर पडली.

आता मात्र आंद्रे शिडीवरून वर गेला.

त्याच्या भविष्यापेक्षा

पुतळा अधिक महत्त्वाचा होता.





डेकवर आल्यावर

त्याला मोठमोठ्या लाटा

जहाजावर आदळत असलेल्या दिसल्या.

जोराचा पाऊस जहाजाला झोडपत होता.

आंद्रे एका खलाशावर आदळला.

वारा जोरजोरात घोंघावत होता.

आंद्रे मोठ्याने ओरडला,

“खाली, सामानाच्या भागात

एक दोरखंड तुटला आहे.”



वादळ थांबल्यावर आंद्रेला

जहाजाच्या कप्तानापुढे उभे करण्यात आले.

“म्हणजे हा आपला छुपा प्रवासी आहे तर!” कप्तान म्हणाला.

“तुला आता बोटीवर काम करावे लागेल

आणि मग तुला फ्रान्सला परत पाठवून देऊ.”

खलाशी त्याला दाराकडे घेऊन जाऊ लागले,

तसा आंद्रे फारच निराश झाला.

अचानक त्यांना एक झटका देऊन तो ओरडला,

“साहेब, कृपा करून जरा ऐकून घ्या!

मला केवळ पुतळ्याबरोबर अमेरिकेला जायचे होते.

आणि खोके निसटले आहे हे मीच सांगितले ना?”

खलाशाने ओरडून इतरांना सूचना दिल्या.

शिट्ट्या वाजू लागल्या.

दोन खलाशी आंद्रेच्या मागोमाग

खाली उतरले.

कुशल आणि शक्तिवान बोटांनी

त्यांनी निखळलेली खोकी बांधून टाकली.

पुतळा आता सुरक्षित होता.



कप्तानाने विचारले,

“आणि तुझ्या आई-वडिलांचे काय?”

आंद्रेने उत्तर दिले, “मला आई-वडील नाहीत

आणि माझा मालक फार दुष्ट होता.

पण बार्थोल्दीने मला पुतळ्यासाठी काम करू दिले.

पुतळ्याच्या हाताचा तांब्याचा पत्रा मी बसवला आहे.

एक तांबट म्हणून मला

अमेरिकेत काम करायचे आहे.”





कप्तान आता लक्ष देऊन ऐकत होता.

मग आंद्रेने त्याला पुतळ्याबद्दल सांगितले.

पुतळ्याच्या चुणीदार वस्त्राचे, मुकुटाचे

आणि मशालीचे त्याने वर्णन केले.

“साहेब, हे स्वातंत्र्याचे प्रतीक आहे,”

आंद्रे पुढे म्हणाला,

“लोकांना हवे तसे

जगण्याचे स्वातंत्र्य!”

कप्तानाने थोडा विचार केला.

मग खलाशांकडे वळून तो म्हणाला,

“या मुलाला एक बादली आणि पोछा द्या.

अमेरिकेत तो कदाचित तांबट होईलही,

पण आता तरी तो जहाजावरचा साधा कामगार असेल.”

आंद्रेचे मन आशेने भरून आले.

तो आता अमेरिकेत

पुतळ्याबरोबर राहणार होता.

मोठ्या खुशीतच

आंद्रे डेककडे वळला.





नंतर काय झाले...

१७ जून १८८५ रोजी पुतळा सुरक्षितपणे न्यूयॉर्कच्या बंदरात पोचला. पुढील वर्षभरात अमेरिकन कामगारांनी चौथरा पूर्ण केला. अखेर, २८ ऑक्टोबर १८८६ ला स्वातंत्र्य देवतेच्या पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. त्यासाठी एक मोठा समारंभ करण्यात आला. बंदर बोटींनी भरून गेले, राष्ट्राध्यक्षांनी भाषण केले आणि न्यूयॉर्क शहरात मोठे संचलन करण्यात आले.

गेल्या अनेक वर्षांत अमेरिकेत स्थायिक होण्यासाठी येणाऱ्या लोकांनी या स्वातंत्र्य देवतेच्या पुतळ्याला एक नवा अर्थ दिला आहे. अमेरिकेत आल्यावर दिसलेली पहिली गोष्ट म्हणून अनेकांना त्याची आठवण आहे.

हातातील मशाल उंचावून अमेरिकेत नव्याने येणाऱ्यांचे ही देवता स्वागत करते आणि त्यांना स्वातंत्र्याचा मार्ग दाखवते. अमेरिकेतील सर्व लोकांसाठी ती मैत्री, स्वातंत्र्य आणि आशेचे महान प्रतीक आहे.